
# अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय?

देवेंद्र फडणवीस




पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
१७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय?

लेखक
देवेंद्र फडणवीस

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
१७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

**प्रकाशक :**
के. एन. शिरकांडे एम.एस्सी., बी.एड्.
कार्याध्यक्ष,
पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनासाठी
१७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

**संपादन सहाय्य**
मंगेश कश्यप - पुणे

© **लेखकाधीन**

**प्रथम मुद्रण :**
चैत्र शुक्ल १, श्री. शालिवाहन शके १९२७
वर्ष प्रतिपदा, शनिवार दि. ९ एप्रिल २००५

**द्वितीय मुद्रण :**
२४ मार्च २०१०
(श्री रामनवमी)

**किंमत :** पन्नास रुपये फक्त

**मुद्रक :**
रामचंद्र शेटे
संचालक
पुणे विद्यार्थी गृह
महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखानाकरिता
१७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

विधान परिषदेतील **'वाघ'** म्हणून नावलौकिक
असलेले लोकसंग्रही आणि जनसामान्यांचा बुलंद आवाज
म्हणून ओळखले जाणारे माझे स्वर्गीय वडील

**आमदार कै. गंगाधरराव फडणवीस**

आणि

त्यांच्या पश्चात आजतागायत खंबीरपणे
पाठराखण करणारी माझी आई

**सरिता फडणवीस**

यांना समर्पित.

# शुभेच्छा

अर्थसंकल्प किंवा ज्याला आपण 'बजेट' म्हणतो हा विषयच मुळी भल्या-भल्यांच्या कपाळावर आठ्या आणणारा आहे. अर्थसंकल्पातील विविध परिभाषा, यांचे अर्थ, अनेकविध तरतूदी, ग्रीन बुक व व्हाईट बुक मधील माहिती समजावून घेणे सदस्यांसाठी एक आव्हान असते असे म्हटले तर मुळीच वावगे ठरणार नाही. राज्याच्या प्रगतीचा लेखाजोखा अर्थसंकल्पात मांडला जातो. त्यावर साधक-बाधक चर्चा होत असते. सदस्यांना अर्थसंकल्पावरील चर्चेत अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडता येऊ शकतात. कुठल्याही शासनासाठी अर्थसंकल्पाचे नियोजन आणि सादरीकरण कसोटीचे असते. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे या दृष्टीने सर्वात जास्त महत्त्व असते.

मात्र असा हा अर्थसंकल्प नेमका कसा तयार केला जातो, अंदाजपत्रक तयार करताना कोणत्या बाबींना विचारात घ्यावे लागते, अशा अनेक गोष्टींचा अभ्यास त्या जटील असल्या तरी सदस्य म्हणून प्रत्येकाने करणे जरुरी आहे. केवळ विधीमंडळ सदस्यच नव्हे तर अधिकाऱ्यांनी देखील बजेटचा अर्थ समजावून घेऊन त्याचे विश्लेषण करण्याची हातोटी आत्मसात केली पाहिजे. पैशाच्या उत्तम नियोजनाचे एक महत्त्व आहे, या नियोजन प्रक्रियेत तज्ज्ञांचा समावेश असला तरी अर्थसंकल्पाचे प्राथमिक ज्ञान आपणा सर्वांना असणे गरजेचे आहे, यादृष्टीने श्री. देवेंद्र फडणवीस यांचे हे पुस्तक खूप मोलाचे ठरेल असे मला वाटते.

राज्याच्या नियोजनाची कार्यपद्धती समजावून घेण्यासाठी तसेच अनेक तांत्रिक बाबींचा उलगडा सहज होण्याचा दृष्टीने ह्या पुस्तकाचा उपयोग होईल, अशी मला आशा आहे. श्री. फडणवीस यांचा विधीमंडळ कामकाजाचा अनुभव लक्षात घेता ह्या कामकाजाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या छोट्या छोट्या पुस्तिका सहजसोप्या मांडणीनिशी तयार केल्या तर विद्यार्थ्यांपासून ते संशोधकांपर्यंत सर्वांना उपयुक्त ठरतील.

मी श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या या उपक्रमास हार्दिक शुभेच्छा देतो.

**अशोक चव्हाण**

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

# प्रस्तावना

मनुष्याच्या वैयक्तिक आणि सामाजिक अंगाचे एक अपरिहार्य वास्तव म्हणजे त्याचे अर्थकारण होय. अर्थकारणाशिवाय मनुष्यजीवन पूर्णत्वास जावू शकत नाही. यामुळेच तर आपल्या पूर्वसुरींनी धर्म-अर्थ-काम-मोक्ष या चार पुरुषार्थांमध्ये धर्मा नंतर अर्था ला महत्त्वाचे स्थान दिले. कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' ग्रंथात अडीच हजार वर्षापूर्वी सांगितलेली मार्गदर्शक सूत्रे विद्यमान केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांना आजही आपल्या अर्थसंकल्पात उद्‌धृत करावीशी वाटतात. व्यक्तीचा देश, राज्य, संस्कृती, समाज, संस्कार कोणतेही असोत त्याला जन्मापासून मृत्यूपर्यंत अर्थकारणाला आणि त्यायोगे अर्थसंकल्पांना सामोरे जावेच लागते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताची वाटचाल पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाली आणि त्याचवेळी आधुनिक महाराष्ट्राची मुहूर्तमेढ स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली रोवली गेली. लोककल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तेव्हा अनेक निर्णय घेतले गेले. योजना राबविल्या गेल्या. विकासोन्मुख ध्येय धोरणांचे प्रतिबिंब त्या त्या वेळच्या अर्थसंकल्पांमध्ये आपल्याला बघायला मिळते. लोकल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य करीत असतानाच नव्वदच्या दशकात आर्थिक उदारीकरणाचाही स्वीकार आपण तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री व सध्याचे पंतप्रधान मा. श्री. मनमोहनसिंगजी यांच्या मूलगामी ध्येय धोरणांद्वारे समर्थपणे करु शकलो. भारतीय अर्थव्यवस्थेने हे जे जगाभिमुख नवे वळण घेतले त्याचेही स्पष्ट प्रतिबिंब आपल्याला त्या त्या अर्थसंकल्पामध्ये बघायला मिळू शकते. अर्थसंकल्पातील एखाद्या छोट्या तरतुदीमुळे फार मोठा परिणाम, विधायक बदल संबंधित समाजघटकांवर परिणामी देशावर होत असतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही उदारीकरणनीती हे होय. अर्थात अर्थसंकल्प म्हणजे रूक्ष आकडेवारी, क्लिष्ट संकल्पना आणि बोजड दस्तऐवज असा सार्वत्रिक समज अद्यापही कायम आहे. काय महागले अन् काय स्वस्त

झाले, इतक्याच मर्यादित अर्थाने सर्वसामान्य नागरिकही अर्थसंकल्पासारख्या महत्त्वाच्या विषयाकडे बघताना दिसतात. या महत्त्वपूर्ण विषयाकडे अधिकाधिक समाजघटकांनी लक्ष द्यावे व राज्यव्यवस्थेचे हे अविभाज्य अंग समजून घ्यावे यादृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत.

... अशा प्रयत्नांपैकीच एक स्वागतार्ह उपक्रम म्हणजे विधानसभेतील अभ्यासू सदस्य आणि माझे मित्र श्री. देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेले अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय? हे पुस्तक होय. विधीमंडळ सदस्यांना तसेच नागरिकांना अर्थसंकल्प नेमका तयार कसा होतो, अर्थसंकल्प सादर झाल्यावर त्यावर विधीमंडळात होणारी चर्चा, अर्थसंकल्पाशी निगडित सातत्याने वापरल्या जाणाऱ्या संज्ञा याविषयी उपयुक्त माहिती या पुस्तकाद्वारे मिळू शकेल. या पुस्तकाची पहिली आवृत्ती मार्च २००५ मध्ये प्रकाशित झाली होती आणि पाच वर्षात आवश्यक त्या सुधारणांसह दुसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे. यावरुन अशा स्वरुपाच्या उपयुक्त प्रकाशनांना असलेली मागणी व त्याचे महत्त्व स्पष्ट होते. क्लिष्ट विषय सर्वांना समजेल अशा सोप्या व सुबोध भाषेत मांडणे हा आमदार श्री. देवेंद्र फडणवीस यांचा सभागृहातील भाषणांप्रसंगी जाणवणारा गुणविशेष या पुस्तकात सुद्धा पानोपानी प्रत्ययास येतो. हे मी या ठिकाणी विशेष आनंदाने नमूद करु इच्छितो. राज्याच्या अर्थसंकल्पाविषयी एक नवी जाणीव या पुस्तकामुळे सर्वांमध्ये निर्माण होईल अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. आमदार श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हातून यापुढेही सन्माननीय सदस्यांना तसेच नागरिकांना उपयुक्त ठरणारी आणि संसदीय लोकशाहीच्या परिपक्वतेसाठी आवश्यक असणारी प्रबोधनात्मक दृष्टीकोन विकसित होईल अशी ग्रंथसंपदा निर्माण व्हावी, ही मनःपूर्वक शुभेच्छा! सर्व सन्माननीय सदस्यांनी व जाणकार वाचकांनी हे पुस्तक अवश्य वाचावे, ही आग्रहाची विनंती...

**दिलीप वळसे-पाटील**
अध्यक्ष विधानसभा
विधान भवन, मुंबई ४०० ०३२

# मनोगत

संसदीय लोकशाहीमध्ये अर्थसंकल्प म्हणजे शासनाच्या विविध धोरणांचे व कामगिरीचे आर्थिक प्रकटीकरण आहे. अर्थात या प्रकटीकरणाचा अविभाज्य भाग म्हणजे नियोजन व नियोजन हे विकासाचे अविभाज्य अंग आहे. सामान्यतः अर्थसंकल्प म्हणजे अवजड, किचकट आकडेमोड असून 'ये अपनी बस की बात नही' असाच सर्वसाधारण समज आहे. परंतु माहिती आणि ज्ञान हाच पारदर्शी कारभाराचा मूलमंत्र आहे. यामुळे अर्थसंकल्पातल्या जनजीवनावर सर्वाधिक प्रभाव टाकणाऱ्या बाबींची माहिती ही जनसामान्यांपर्यंत पोहचविणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रातील युवा आमदारांनी विधान मंडळात स्थापन केलेल्या 'यूथ फोरम'च्या बैठकीत नवीन आमदारांची विधिमंडळ तसेच शासकीय कामकाज शिकण्याची जिज्ञासा बघितल्यावर केवळ त्यांनाच नव्हे तर जनसामान्यांना अर्थसंकल्पाचे सूत्र समजेल असे एखादे सोपे पुस्तक लिहावे अशी कल्पना सुचली आणि या पुस्तकाच्या रूपाने ती प्रत्यक्षात आली. मी काही या क्षेत्रातला तज्ज्ञ नाही आणि हे पुस्तक तज्ज्ञांकरिता लिहिलेले नाही. विधिमंडळातील सदस्य आणि नागरिक यांना सोप्या भाषेत अर्थसंकल्प कसा तयार होतो, त्याची विधिमंडळातील प्रक्रिया काय, अर्थसंकल्प वाचायचा म्हणजे नेमके काय वाचायचे, सातत्याने वापरल्या जाणाऱ्या विविध संज्ञांचे अर्थ काय, अर्थ-संकल्पीय प्रकाशनात मिळणाऱ्या कलर कोड असलेल्या व इतर तीन ते चार डझन पुस्तकात नेमके काय असते हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हे पुस्तक लिहिताना त्यातील प्रकरणांचा क्रम काहीसा मागे-पुढे वाटेल, पण तो जाणूनच तसा ठेवण्यात आला आहे आणि अनेक महत्त्वपूर्ण बाबींचा अर्थ सांगताना तांत्रिक शब्द न वापरता किंवा तंतोतंत तांत्रिक अर्थ न सांगता त्याचा अभिप्रेत अर्थ सांगितला आहे.

या पुस्तकाच्या निर्मितीसाठी अर्थ व नियोजन खात्याचे सचिव (सुधारणा) श्री. सहानी यांनी शासनाच्या अर्थखात्याने १९८५ साली प्रकाशित केलेले Theoretical & Practical Aspect of Government Budgeting हे पुस्तक संदर्भासाठी दिले, जे या पुस्तकाच्या निर्मितीत

मोलाचे ठरले. त्याचप्रमाणे विधानमंडळ ग्रंथालयातील ग्रंथपाल श्री. चव्हाण व श्री. वाघमारे यांनीही अनेक संदर्भग्रंथ दिले. तसेच या कामी महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयाची प्रकाशनेही मोलाची ठरली. या संपूर्ण पुस्तकाचे हस्तलिखित माझे सचिव संजय येलोरे यांनी अत्यंत तत्परतेने टंकमुद्रित करून दिले. पुणे येथील माझे मित्र आणि अथर्व कम्युनिकेशनचे संचालक मंगेश कश्यप यांनी या हस्तलिखितावर संपादकीय संस्कार केले. श्री. कश्यप यांच्या तत्परतेने पुस्तकाला आजचे मूर्त स्वरूप प्राप्त झाले. पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे संचालक श्री. रामचंद्र शेटे यांनी संस्थेच्या महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना ऑफसेट विभागात आत्मीयतेने व अत्याल्पावधीत या पुस्तकाच्या छपाईचे काम केले. या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

या पुस्तकाच्या निर्मितीत माझे कुटुंबीय तसेच मित्र परिवार या सर्वांचे अमोलिक सहकार्य मिळाले. त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीला राज्याचे महत्त्वाकांक्षी आणि अभ्यासू मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी शुभेच्छा दिल्या व विधानसभा अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. अर्थ संकल्प म्हणजे नेमके काय? या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीला विधानमंडळ सभासदांनी, अभ्यासकांनी, प्रशासकांनी, एम.बी.ए., कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला त्यामुळे माझाही उत्साह वृद्धींगत झाला, अनेकदा अर्थसंकल्प अथवा बजेट हा तसा सर्वसामान्यांच्या दृष्टिने उपेक्षीत राहीलेला विषय आहे. हा विषय मी अधिक साप्या रितीने मांडण्याचा माझा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे, या दुसऱ्या सुधारित आवृत्तीचेही सर्व क्षेत्रातील जाणकार, अभ्यासक, तज्ज्ञ, स्वागत करतील अशी खात्री वाटते.

हे पुस्तक वाचकांच्या अर्थसंकल्पविषयक ज्ञानात निश्चितच भर घालणारे ठरेल, असा मला विश्वास वाटतो व त्याचे पडसाद विधायक कार्यात दृष्टिपथात येवोत, अशी प्रभुचरणी प्रार्थना.

दि. बुधवार २४ मार्च २०१० **देवेंद्र फडणवीस**
(श्री रामनवमी)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | बजेट / अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय? | ११ |
| २. | नियोजन प्रक्रिया | १२ |
| ३. | विधान मंडळात बजेटचे पुस्तक म्हणजे नेमके काय मिळते? | १९ |
| ४. | काही महत्त्वाच्या संज्ञांचे (Terms) चे अर्थ | ३० |
| ५. | राज्याच्या उत्पन्नाचे अंदाजपत्रक तयार करणे | ३६ |
| ६. | राज्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे | ४० |
| ७. | विधिमंडळात बजेटची प्रक्रिया | ४२ |

एक

# अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय ?



शासनाच्या धोरणांची म्हणजेच संकल्पाची आर्थिक अभिव्यक्ती म्हणजे अर्थसंकल्प. भारतीय राज्यघटनेने लोकशाही पद्धतीने देशाचा आणि राज्याचा कारभार चालावा म्हणून जे नियम/तरतुदी केल्या आहेत त्यात राज्याचा आर्थिक कारभार हा देखील लोकशाही पद्धतीने चालविणे अभिप्रेत आहे; म्हणूनच राज्य कारभार चालविताना जो आर्थिक जमा-खर्चाचा ताळेबंद तयार होतो तो लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी म्हणजे विधानसभेने संमत करावा अशी तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद म्हणजे विधानमंडळाची (Legislature) शासनावर (Executive) नियंत्रण ठेवण्याची एक अत्यंत चांगली यंत्रणा आहे.

राज्यघटनेत बजेट / अर्थसंकल्प असा शब्द कुठेही आढळून येत नाही. तर त्यात वार्षिक वित्त विषयक विवरण पत्र (Annual Financial Statement) असा शब्द वापरला गेला आहे. राज्यघटनेने राज्यपालांवर ही जबाबदारी दिली आहे की त्यांनी शासनामार्फत प्रत्येक आर्थिक वर्षाला (१ एप्रिल ते ३१ मार्च) त्या आर्थिक वर्षातील शासनाला प्राप्त होणाऱ्या अंदाजित महसूल / जमा आणि शासनाचा अंदाजित खर्च याचा ताळेबंद विधान मंडळासमोर सादर करावा.

थोडक्यात बजेट म्हणजे शासनाच्या ध्येय धोरणांचे आर्थिक प्रगटीकरण असून शासनाच्या आर्थिक कारभारावर विधान मंडळाचा अंकुश ठेवण्याचे प्रभावी माध्यम आहे.

दोन

# नियोजन प्रक्रिया



## प्रस्तावना

देशामध्ये समतोल विकासाकरिता सर्व राज्यांनी काही समान उद्दीष्ट ठेवून त्यावरती निधी खर्च केला पाहिजे म्हणून देशाने पंचवार्षिक योजना पद्धत स्वीकारली.

योजनेच्या पाच वर्षाच्या कालावधीत प्रत्येक विभागाने कोणते भौतिक उद्दिष्ट गाठायचे, कसे गाठायचे, त्याला नेमका निधी किती लागणार व तो कुठून येणार याबाबत प्रत्येक विभाचा टास्क फोर्स त्या विभागाची योजना तयार करतो व त्याला मान्यता मिळाल्यानंतर ती योजना कार्यान्वित केली जाते. सद्या ११वी पंचवार्षिक योजना सुरु असून २००७-१२ या कालावधीकरिता ही योजना आहे.

केंद्रीय पंचवार्षिक योजने प्रमाणे राज्य देखील आपली पंचवार्षिक योजना तयार करतात तसेच, प्रत्येक वर्षी त्या वर्षापुरती वार्षिक योजना तयार करुन त्याला केंद्रीय योजना आयोगाची मान्यता घेतात.

योजना त्रिस्तरीय असते

(१) केंद्रीय पंचवार्षिक योजना

(२) राज्याची वार्षिक योजना

(३) जिल्हा योजना

राज्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक समजून घेताना राज्याच्या नियोजनाची कार्यपद्धती समजून घेणे अत्यावश्यक आहे. अपेक्षित साध्य मिळविण्या साठी उपलब्ध साधनसंपत्तीचे वाटप करण्याच्या दृष्टीने प्रथम विचार करून कार्यवाही करणे ही मूलतः नियोजन प्रक्रिया आहे. नियोजन प्रक्रियेत साधारणतः खालील ४ टप्प्यांचा समावेश होतो.

**१. उपलब्ध साधनसंपत्ती काय आहे.**

**२. अपेक्षित उद्दिष्टे काय आहेत.**

**३. ती कशी प्राप्त केली पाहिजेत.**

**४. प्रत्यक्षात काय प्राप्त झाले आहे.**

सनियंत्रण, माहिती मिळविणे, मूल्यमापन, फेरबदल व समायोजन या बाबींचा यात समावेश आहे.

विकासाची कामे अगदी ब्रिटिश शासनाच्या काळात देखील हाती घेतली जात होती. तथापि त्यावेळी लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत, राहणी-मानात सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनाऐवजी दुसऱ्या महायुद्धामुळे विस्कळीत झालेल्या अर्थव्यवस्थेची पुनर्बांधणी करणे असा दृष्टिकोन होता. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर केंद्र शासनाने देशामध्ये नियोजनाच्या प्रक्रियेस प्रारंभ केला. विकासाच्या लाभाचे समान वाटप आणि जलद गती निश्चित करण्यासाठी योजनाबद्ध विकास हा उद्देश होता. याकरिता जनतेच्या किमान गरजा भागविण्यावर भर देणे, मूलभूत सुविधा आणि रोजगार निर्माण करणे आवश्यक होते. यंत्रसामग्री व वस्तूचे उत्पादन करणे, देशाला स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण बनविण्यासाठी परदेशावरील अवलंबन कमी करणे या गोष्टींना महत्त्व देणे आवश्यक होते. आत्तापर्यंतच्या अकरा पंचवार्षिक योजनांच्या उद्दिष्टांवरून हे दिसून येईल. श्रीमंत आणि गरीब यातील दरी कमी करणे आणि त्याकरिता समाजाची समाजवादी व्यवस्था घडविणे हेही एक ध्येय होते. ही पार्श्वभूमी विचारात घेऊन केंद्र शासनाने १९५२ मध्ये योजना आयोगाची स्थापना केली आणि तेव्हापासून खऱ्या अर्थाने नियोजनाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.

## नियोजन यंत्रणा

आधी नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय स्तरावर योजना आयोगाची स्थापना १९५२ मध्ये करण्यात आली. पंतप्रधान हे या आयोगाचे अध्यक्ष असतात आणि केंद्रीय वित्त व नियोजन मंत्री आणि महत्त्वाचा कार्यभार सांभाळणारे इतर मंत्री सदस्य असतात.

तसेच नियोजन, अर्थ, वित्त, उद्योग, समाजशास्त्र इ. क्षेत्रातील काही तज्ज्ञांची अशासकीय सदस्य म्हणून निवड केली जाते. योजना आयोगाचे दैनंदिन कामकाज पाहाण्यासाठी एका उपाध्यक्षांची निवड केली जाते.

राष्ट्रीय स्तरावर नियोजन प्रक्रियेमध्ये गुंतलेली दुसरी संस्था म्हणजे राष्ट्रीय विकास परिषद होय. प्रधानमंत्री या परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात व यात सर्व राज्यांचे मुख्यमंत्री केंद्रशासित प्रदेशांचे राज्यपाल व योजना आयोगाच्या सर्व सदस्यांचा समावेश असतो. ही संस्था राष्ट्रीय स्तरावर धोरणे ठरविणारी सर्वोच्च संस्था आहे व ती योजनेचे धोरण ठरविणे, पंचवार्षिक / वार्षिक योजना याबद्दल मार्गदर्शन करते.

## महाराष्ट्रातील नियोजन यंत्रणा

राज्य स्तरावर नियोजन उपसमिती आणि राज्य नियोजन मंडळ या दोन उच्चस्तरीय संस्था आहेत. त्यांची कार्ये साधारणतः योजना आयोग किंवा राष्ट्रीय विकास परिषद यांच्या कार्यासारखीच आहेत. मुख्यमंत्री दोन्ही संस्थांचे अध्यक्ष असून मंत्री वित्त व नियोजन हे सदस्य आहेत. राज्याच्या विविध भागांचे प्रतिनिधित्व करणारे आणि महत्त्वाचा कार्यभार सांभाळणारे नियोजन उपसमितीचे सदस्य असतात. नियोजनासंबंधीच्या विविध विकासक्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारे अशासकीय सदस्य म्हणून नेमणूक केली जाते. नियोजन उपसमितीचे कार्य नियोजनाबाबतच्या सर्व बाबींबाबत अंतिम निर्णय घ्यायचा असून राज्य नियोजन मंडळ ही सल्ला देणारी संस्था आहे.

## नियोजन विभागाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत

१. योजनेची धोरणे ठरविण्याबाबत शासनास मदत करणे.

२. राज्याची पंचवार्षिक वार्षिक यथार्थदर्शी योजना तयार करणे.

३. योजना तयार करून त्याची अंमलबजावणी व संनियंत्रण करणे.

४. मूल्यमापन.

५. योजनेच्या साधनसंपत्तीचे मूल्यांकन करणे.

६. वित्तीय संस्थांमार्फत वित्त पुरवठ्याचे समन्वय (बाह्य सहयोग प्रकल्पांसह)

पंचवार्षिक व वार्षिक योजना तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये योजनेसाठी उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचे मूल्यमापन करण्याच्या संदर्भात वित्त विभागाचाही अत्यंत निकटचा सहभाग असतो. खालील बाबींच्या आधारे साधन संपत्तीचे मूल्यमापन केले जाते.

१. चालू महसुलातील शिल्लक.
२. सार्वजनिक उपक्रमांद्वारे अंशदान.
३. राज्य भविष्यनिर्वाह निधी.
४. अल्पबचतीवरील कर्ज.
५. संकीर्ण भांडवली आवक (निव्वळ).
६. अतिरिक्त अर्थबळ उभारणी.
७. बाँड/कर्जरोखे.
८. सुरुवातीच्या शिलकीचे समायोजन.
९. खुल्या बाजारातील कर्ज.
१० करारानुसार कर्ज (एल.आय.सी., जी.आय.सी., नाबार्ड, इ.)
११ केंद्रीय सहाय्य
    (अ) सर्वसाधारण
    (ब) बाह्य सहाय्यित प्रकल्प.

राज्याच्या नियोजनाचे ३ भाग असतात. जिल्ह्याचे नियोजन, राज्याचे नियोजन व वैधानिक विकास महामंडळामार्फत अनुशेषाचे नियोजन केले जाते. जिल्हा नियोजनाकरिता प्रत्येक जिल्ह्याला आधी कळविले जाते की तुम्हाला इतकी मर्यादा दिलेली असून त्यानुसार जिल्हा पातळीवर नियोजन करावे. जिल्हा नियोजन समितीमध्ये त्याबाबतची चर्चा करून तो नियोजन अहवाल आमच्या-कडे पाठवावा. या नियोजनाला शेवटी राज्यशासन मंजुरी

देते. त्याचे जिल्हास्तरावरील योजना आणि विशेष घटक योजना, आदिवासी योजना व आदिवासी उपयोजना असे भाग पडतात. राज्य नियोजनाच्या संदर्भात प्रत्येक विभागाबरोबर चर्चा केली जाते. मागील नियोजनामध्ये कोणकोण्यात्या योजना घेतल्या होत्या त्याचे मूल्यमापन केले होते काय, लोकांना त्याचा फायदा झाला काय, त्यात संशोधन करणे आवश्यक आहे काय, सुधारणा करण्यास वाव आहे काय, या मुद्यांबाबत चर्चा होते. या चर्चेच्या वेळी सचिव महोदय, त्यांचे अधिकारी, तज्ज्ञ उपस्थित असतात. त्यानंतर प्रत्येक विभागाच्या नियोजनाचा आकार तात्पुरत्या स्वरूपात निश्चित केला जातो. वैधानिक विकास मंडळाची जबाबदारी पूर्णपणे राज्यपालांवर आहे. तिन्ही विभागांमध्ये जो अनुशेष आहे त्याप्रमाणे तुम्ही इतके नियोजन करावे, जेणेकरून पुढील प्रस्तावीत वर्षांमध्ये अनुशेष भरून काढता येईल असे निर्देश ते देतात. या संदर्भात त्यांच्याकडून प्रत्येक वर्षी राज्य शासनाला सूचना केल्या जातात.

राज्याच्या नियोजनाचा आकार किती असावा हे राज्याच्या साधनसंपत्तीवर अवलंबून असते. आपल्याकडे वित्त विभागाकडून डिसेंबर महिन्यामध्ये सांगितले जाते की, पुढील वर्षाकरिता एवढी साधनसंपत्ती उपलब्ध आहे आणि त्यानुसार नियोजन निश्चित करावे लागेल. ते नियोजन विभागाला अर्थसंकल्पीय स्रोत कळवितात. बजेटमध्ये जाणारी तरतूद कळवितात. रोखे उभे करणे हा योजनाबाह्य भाग आहे.

एकदा नियोजनाचा आकार कळला की त्याला शासनाची मान्यता घ्यावी लागते. त्यानंतर नियोजन मंडळामध्ये चर्चा होते.

नियोजन मंडळाकडून डिसेंबरमध्ये नियोजनानुसार तुमची साधनसंपत्ती काय आहेत याची विचारणा केली जाते. राज्याची गरज किती आहे, राज्याचे दायित्व किती आहे, देणे किती आहे, किती रोखे उभे आहेत. खर्च वाढलेला आहे काय, या सर्व बाबी विचारात घेतल्यानंतर किती रक्कम उपलब्ध होऊ शकते याचा विचार केला जातो. त्यानंतर नियोजन मंत्रिमंडळाच्या उपसमितीसमोर जातो. या समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतात. या बैठकीत राज्याच्या नियोजनाचा आकार १४ हजार कोटींचा असावा, की २५ हजार कोटींचा असावा यासंबंधीची चर्चा होऊन ३१ मार्चनंतर किती निधी उपलब्ध होणार आहे, विकासाच्या कामासाठी किती

राहणार आहे, जिल्हा नियोजन किती आहे, कमिटेड एक्सपेंडीचर किती आहे, हा खर्च वजा जाता किती शिल्लक राहणार आहे याचा विचार होतो. आपण आणखी उत्पन्नाचे मार्ग उभे करू शकतो काय, उदा. नवीन कर आकारणे, सबसिडीचे प्रमाण कमी करणे, महसुली खर्च कमी करून उत्पन्न मिळू शकते काय, याचा विचार केला जातो, या समितीमध्ये वित्त सचिव असतात. त्यानंतर निर्णय होऊन राज्याच्या नियोजनाचा आकार तयार करण्यास सांगितले जाते. नियोजन करताना थोड्या मर्यादा असतात. केंद्र सरकारकडून अर्थसहाय्य मिळते. ज्याचा पैसा थेट मिळतो त्याचा आपल्याला योजनेमध्ये समावेश करावा लागतो. त्यामध्ये राज्याच्या हिश्श्याचा भाग असतो. राज्यघटनेच्या ३७१ (२) कलमानुसार वैधानिक विकास मंडळांची जबाबदारी राज्यपालांवर आहे, त्यासाठी तरतूद करावी लागते, या कायदेशीर बाबी आहेत. डोंगरी विकास कार्यक्रमासाठी तरतूद करावी लागते. अर्थसंकल्पात समाविष्ट न होणाऱ्या भागातून आपल्याला कर्जरोखे उभे करता येतात. रोखे उभे करण्यासाठी नियोजन मंडळाची परवानगी घेतल्यानंतर मंत्रिमंडळाच्या उपसमितीसमोर हा विषय जातो.

याचाच अर्थ असा की, राज्याचे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करताना पहिले राज्याच्या तिजोरीतला पैसा हा स्टँडींग चार्जेसवर खर्च केला जातो. उदा. कर्मचाऱ्यांचे पगार, कर्जावरील व्याज इ. बाबींना अत्यावश्यक खर्च म्हणजे स्टँडींग चार्जेस म्हणतात व उर्वरित पैसा हा योजनेअंतर्गत प्रत्येक विभागाला दिला जातो. प्रत्येक विभागाच्या योजनांकरिता नियतव्यय दिला जातो. नियतव्यय म्हणजे विभागाच्या खर्चाकरिता राखून ठेवलेली रक्कम. या नियतव्ययात त्या त्या विभागाला कोणते काम द्यायचे ते ठरवावे लागते.

हे अंदाजपत्रक तयार करताना तीन प्रकारच्या योजनांतर्गत खर्चाचा विचार करावा लागतो.

१. **केंद्रपुरस्कृत योजना (Centrally Sponsored Plan Scheme)** म्हणजे ज्या योजनांचा खर्च पूर्णपणे अथवा अंशतः केंद्र शासन देते.

२. **केंद्रीय योजना अंतर्गत स्कीम्स (Centrally Plan Scheme) :** केंद्र शासनाच्या वार्षिक योजनेतील योजना असतात, परंतु त्याची

काम करणारी एजन्सी राज्य शासन असते अशा योजना. (राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम)

३. **राज्य शासनाच्या वार्षिक योजनेतील कामे/योजना केंद्रपुरस्कृत योजना:** या योजना राज्याच्या वार्षिक योजनेत असतात आणि पूर्णपणे राज्य शासनाच्या रिसोर्सेसमधून पूर्ण कराव्या लागतात.

४. **जिल्हा योजने अंतर्गत कामे/योजना:** वार्षिक योजनेतील जिल्हा-स्तरीय योजना ज्या जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या अखत्यारीत चालतात.

केंद्र पुरस्कृत योजना असो की केंद्रीय योजनांतर्गत खर्च असो राज्य शासनाला आपल्या अंदाजपत्रकात खर्चाच्या केंद्र शासनाच्या हिश्शाची तरतूद दर्शवावी लागते.

तीन

# विधानमंडळात बजेटचे पुस्तक म्हणजे नेमके काय मिळते ?



विधानमंडळात अर्थमंत्री बजेट सादर करतात. त्यामध्ये बजेटचे भाषण दोन भागांमध्ये ते वाचून दाखवितात. बजेट सादर झाल्यानंतर बजेटच्या नावाखाली पुस्तकांनी भरलेली एक भली मोठी सुटकेस प्राप्त होते. या सुटकेस मधील पुस्तकांची थप्पी बघितल्यावर अनेकांना धडकीच भरते. अबब हे तर फारच मोठे प्रकरण आहे. इतकी आकडेमोड वाचायची तरी कधी आणि समजायची तरी कशी म्हणून अनेक लोक हे आपल्या डोक्याबाहेरचे प्रकरण आहे, असे समजून ते वाचण्याची तसदीही घेत नाहीत. म्हणूनच या प्रकरणात बजेटरूपी पुस्तकांच्या गठ्ठ्यांत काय असते हे सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे.

## (अ) अर्थमंत्र्यांचे भाषण

या भाषणाचे दोन भाग असतात. पहिला भाग म्हणजे राज्याची आर्थिक स्थिती, शासनाने पूर्वी हाती घेतलेल्या महत्त्वाच्या योजनांसंदर्भात पार पाडलेली कामे, आगामी वर्षात हाती घ्यावयाची महत्त्वाची कामे, शासनाचे धोरणविषयक महत्त्वाचे निर्णय इत्यादी बाबींवर प्रकाश टाकणारा असतो तर दुसरा भाग हा शासनाचे विविध करांबाबतचे धोरण, त्यातील सवलती, नवे कर इ. बाबींचे विवेचन करणारा असतो.

## (ब) अर्थसंकल्पीय प्रकाशने

**अर्थसंकल्प म्हणून खालील प्रकाशने प्राप्त होतात.**

## १. राज्याची आर्थिक पाहाणी

राज्याच्या योजना आणि सांख्यिकी विभागाने केलेल्या सर्व्हेच्या आधारावर राज्याची सामाजिक आर्थिक परिस्थितीची संपूर्ण आकडेवारी यात दिलेली असते व राज्याची एकूण स्थिती व देशाच्या तुलनेत परिस्थिती या पुस्तकाने समजण्यास मदत मिळते. सदर प्रकाशन नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून वितरित करण्यात येते. राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची ठळक वैशिष्ट्ये या प्रकाशनात नमूद केलेली असतात. राज्याच्या सामाजिक नि आर्थिक विकासाची गती दाखविणारी आकडेवारी आणि इतर राज्यांशी विकासाबाबत सुलभरीत्या तुलना करता यावी म्हणून इतर राज्यांचे विवक्षित सामाजिक नि आर्थिक स्थितीदर्शक निर्देशांक (Socio-Economic Indicators) सुद्धा यात दिलेले असतात. या प्रकाशनाच्या पहिल्या भागात राज्याचे उत्पन्न, शेती, उद्योग, राहणीमान इ. सारख्या विविध गोष्टींचा आढावा घेतला जातो. या प्रकाशनाच्या दुसऱ्या भागात (एक) महाराष्ट्रातील कामगारांचे आर्थिक वर्गीकरण, (दोन) मुख्य पिकांखालील क्षेत्रे, (तीन) पाटबंधाऱ्या-खालील क्षेत्रे व (चार) शेतीचे उत्पादन इत्यादींबाबतची आकडेवारी विविध आलेख / तक्त्यांद्वारे देण्यात येते.

## २. संक्षिप्त अर्थसंकल्प

अत्यंत थोडक्यात राज्याची आर्थिक परिस्थिती समजण्यासाठी अत्यंत उपयुक्त असे हे प्रकाशन आहे. या प्रकाशनात अर्थसंकल्पीय वर्षातील शासनाचा महसूल व खर्च यासंबंधीची स्थूल माहिती थोडक्यात दिलेली असते. महसुलात झालेली वाढ व विकास कार्यावरील खर्चातील वाढ दाखविण्यासाठी या प्रकाशनात निरनिराळे आलेख (Graphic Charts) समाविष्ट करण्यात येतात. ही माहिती अर्थसंकल्पाचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते.

## ३. ग्रीन बुक अथवा (Annual Financial Statement)

या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचा रंग हिरवा असतो म्हणून हे ग्रीन बुक. राज्यघटनेच्या अनुच्छेत २०२ (१) च्या तरतुदीनुसार विधानमंडळासमोर

मांडावयाचे बजेट किंवा अर्थसंकल्प म्हणजे हे ग्रीनबुक. हे ग्रीन बुक पाच भागांत विभागलेले एक पुस्तक या स्वरूपात असते.

**भाग एक**: मध्ये मागील वित्तीय वर्षाच्या अंदाजपत्रकात जमा आणि खर्चाचे काय अंदाज व्यक्त केले होते आणि प्रत्यक्षात किती जमा आणि खर्च झाला याचे आकडे देऊन अंदाज आणि प्रत्यक्ष आकडे यामध्ये जी तफावत आहे त्याची कारणे मुख्य लेखा शीर्षाच्या अनुषंगाने दिली जातात.

उदा. २०००-२००१ मध्ये खर्चाच्या हेडमध्ये 'सहाय्यक अनुदाने व अंशदान' या खाली सुधारलेले अंदाज होते ७५३.५९ कोटी व प्रत्यक्षात खर्च झाला ६९८.३६ कोटी म्हणजेच खर्चाच्या अंदाजात तफावत येऊन खर्च अपेक्षित अंदाजापेक्षा ६५.३३ कोटीने कमी झाला. ग्रीन बुकमध्ये याबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे.

'ही सहाय्यक अनुदाने व अंशदाने' याखाली ३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज्य संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे याखाली रुपये ६५.३३ कोटी इतकी खर्चात घट झाली आहे.

**भाग दोन**: ग्रीन बुकच्या भाग दोन मध्ये चालू वित्तीय वर्षामधील जमा खर्चाच्या मुख्य लेखा शीर्षामध्ये अर्थसंकल्प सादर केला होता, तेव्हा काय अंदाज होते आणि वर्षाच्या शेवटी अपेक्षित म्हणजे सुधारित अंदाज काय आहेत हे नमूद करून त्यातील तफावतीची नेमकी कारणे कोणती हे दिलेले असते.

ग्रीन बुकमध्ये यानंतर पुढील वर्षीचा अर्थसंकल्प आढळून येतो ज्यामध्ये महसुली जमा तसेच महसुली खर्च यांचे आकडे दिलेले असतात. त्यामुळे जमा-खर्चाचे हेच आकडे प्रधान शीर्षावर दिलेले असतात आणि त्यात चालू वर्षीच्या सुधारित अंदाजाशी त्याची तुलना करून त्यातील तफावतीची कारणेही नमूद केली असतात.

त्यापुढे अशाच प्रकारचे भांडवली खर्चाचे विवरण दिले असते व त्या खाली कर्जे व आगाऊ रकमा यासाठीची अर्थसंकल्पातील तरतूद व हे कर्ज कोणत्या बाबी करिता किती आहे म्हणजेच कोणत्या बाबीवर किती खर्च होणार आहे याचे विवरण यामध्ये दिले असते.

## विकास कार्यक्रम

यापुढे ग्रीनबुकमध्ये आपल्या राज्याच्या वार्षिक योजनेचे संपूर्ण विवरण प्राप्त होते.

यामध्ये विकास योजनेचे आकारमान किती आहे म्हणजे किती खर्च विकास योजनेअंतर्गत केला जाणार आहे, यासाठी साधनसंपत्ती कोठून येणार आहे, त्यापैकी अर्थसंकल्पात किती तरतूद केली आहे व किती तरतुदींकरिता अर्थसंकल्प बाह्य कर्जे उभारली जाणार आहेत याचे विवरण असते. तसेच अर्थसंकल्पीय नियतव्ययाची क्षेत्रनिहाय विभागणी दिली असते.

उदा. ऊर्जा उद्योग, खनिकर्म, वाहतूक, रस्ते इ. विविध विभागांकरिता किती नियत व्यय दिला गेला आहे.

## एकूण वित्तीय स्थिती

ग्रीन बुकमध्ये प्रस्तुत अर्थसंकल्पातील एकूण वित्तीय स्थिती मांडलेली असते, ज्यात जमा किती व खर्च किती आणि तूट किती याचे विवरण असते.

## विकास मंडळांना नियतव्ययाचे वाटप

ग्रीन बुकमध्ये भारतीय संविधानाच्या अनुच्छेत ३७१ (२) (ब) अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र याकरिता तयार केलेल्या वैधानिक विकास मंडळाला प्रत्येकी किती नियतव्यय उपलब्ध करून दिला आहे व त्यापैकी अनुशेषांतर्गत किती नियतव्यय आहे याचे विवरण पत्र दिले असते.

**भाग तीन :** ग्रीन बुकच्या तिसऱ्या भागात मागील वर्षीचे जमा व खर्चाचे प्रत्यक्ष अंदाज, चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प जेव्हा मांडला तेव्हाचे अंदाज आणि आता वर्ष संपताना सुधारित अंदाज तसेच पुढील वर्षीचे म्हणजे ज्या वर्षीचा अर्थसंकल्प मांडायचा आहे त्यावर्षीचा अंदाज यांचे प्रधान शीर्षवार आकडे दाखविणारे विवरण पत्र असते व यात पुढील वर्षीचे अंदाज हिरव्या रंगात दाखविलेले असतात.

**चौथ्या आणि पाचव्या भागात**ः ऋण व ठेवींच्या शीर्षाखाली जमा व संविस्तरित रकमांची विवरण पत्रे असतात. यातही जमेचे शीर्ष आणि खर्चाचे शीर्षवार प्रत्येक शीर्षात मागील वर्षीचे प्रत्यक्ष अंदाज, चालू वर्षीचे अर्थसंकल्पित आणि सुधारित अंदाज तसेच पुढील वर्षीचे अर्थसंकल्पीय अंदाज दिलेले असतात.

एकूणच या ग्रीन बुकमध्ये राज्याच्या सर्व प्रकारच्या जमा आणि खर्चाचे विवरण सापडते.

## ४. अर्थसंकल्पीय अंदाज (Civil Budget Estimate) अथवा व्हाईट बुक

याचे मुखपृष्ठ पांढरे असते म्हणून याला व्हाईट बुक म्हणतात. यामध्ये ग्रीन बुकमधील अर्थसंकल्पीय तरतुदींचे विस्तृत विवरण असते. शासनाची पै न पै कुठून येते व कुठे खर्च होते याबाबतची संपूर्ण माहिती असते परंतु राज्याची एकूण आर्थिक स्थिती मात्र ग्रीनबुक मध्येच सापडते ती व्हाईट बुकमध्ये सापडत नाही. थोडक्यात प्रत्येक विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाचा विस्तृत आढावा व्हाईट बुकमध्ये मिळतो व त्याची तीन मुख्य व अनेक सहपुस्तके असतात.

व्हाईट बुकचे तीन भाग असतात. ग्रीन बुकचे चारही भाग एकाच पुस्तकात असतात, परंतु व्हाईट बुकचे तीन भाग मात्र तीन मुख्य आणि अनेक सहपुस्तकात असतात त्यामुळेच बजेटची बॅग जड होते.

**भाग एक**ः राज्याच्या तिजोरीत पैसा कुठून येतो त्याचे विववणः यामध्ये राज्याच्या महसुली व इतर जमा बाबतचे विवरण असते. मागील वर्षीचे प्रत्यक्ष उत्पन्न, चालू वर्षीचा अर्थसंकल्प मांडला तेव्हा उत्पन्नाचे काय अंदाज होते आणि आज प्रत्यक्ष परिस्थितीच्या आधारावर पुढील वर्षीच्या उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज मांडलेले असतात.

**भाग दोन**ः राज्याच्या तिजोरीतील पैसा कुठे खर्च होणारः व्हाईट बुकाच्या या भागात मंत्रालयातील प्रत्येक विभागाच्या खर्चाचा तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज असतो. या भागात राज्याच्या योजनांतर्गत आणि योजनेतर खर्चाचा तपशील दिला असतो. हा तपशील मुख्य लेखाशीर्ष,

उपलेखाशीर्ष, गौणशीर्ष इ. शीर्षांतर्गत सविस्तरपणे नमूद केलेला असतो. यामध्ये सर्व विभागाचे खर्चाचे प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोखलेखा असलेले एक पुस्तक असते. याच भाग दोन मध्ये खर्चाची विभागवार पुस्तके असतात. ही साधारणपणे ३० पुस्तके असतात व या प्रकाशनामध्ये राज्य पंचवार्षिक योजनांचा तपशीलवार अंदाजही समाविष्ट असतो.

प्रत्येक विभागाला A पासून तर Z पर्यंत आणि पुढे ZA, ZB, ZC इथपर्यंत उपनाम दिलेले असते.

या पुस्तकात सर्व मंत्रालयीन विभागांचे प्रमुख लेखा शीर्ष क्रमांक व त्या शीर्षा वरील योजनेतील तरतूद, योजनेतर तरतूद व दोन्ही मिळून एकूण तरतूद दाखविलेली असते. उदाहरणादाखल २०५६ तुरुंग किंवा २२०२ सर्वसाधारण शिक्षण इत्यादी.

या तातुदी दर्शविताना तीन कॉलम खाली त्या दाखविण्यात येतात. मागील वर्षीचा प्रत्यक्ष खर्च, चालू वर्षीच्या खर्चाचे सुधारित अंदाज आणि पुढील वर्षीचा अनुमानित खर्च आणि हे सर्व खर्च योजने अंतर्गत किती आणि योजनेतर किती हे देखील स्वतंत्रपणे दर्शविले जाते.

याच भाग दोन मध्ये प्रत्येक विभागाचे स्वतंत्र पुस्तक देखील छापले जाते. या पुस्तकामध्ये त्या विभागाच्या खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज असतात.

भाग दोनमध्ये जिल्हा नियोजन आराखडादेखिल दिला जातो. यात प्रत्येक जिल्ह्याचे स्वतंत्र पुस्तक असते. त्यात जिल्हा नियोजन समितीने तयार केलेला आणि राज्य शासनाने मान्य केलेला जिल्हा नियोजनाचा आराखडा (DPDC) असतो.

**उदाहरण**: मुख्य पुस्तकात २२१५ पाणीपुरवठा व स्वच्छता या शीर्षाखाली २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात आदिवासी विकास विभाग या प्रशासकीय विभागासमोर २,५९,१२५ इतकी तरतूद तर पाणीपुरवठा, स्वच्छता या प्रशासकीय विभागाकरिता १,२५,६६,६१७ रुपये इतकी तरतूद म्हणजे एकूण १,२८,२५,७४२ रुपये इतकी तरतूद दाखविली आहे. म्हणजेच या शीर्षाखालील २,५९,१२५ ची तरतूद ही आदिवासी विकास विभागाचे जे अर्थसंकल्पीय अंदाजाचे पुस्तक असेल त्याच्या २२१५ पाणीपुरवठा व

स्वच्छता या शीर्षाखाली सापडेल तर रुपये १,२५,६६,६१७ कोटींची तरतूद पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या पुस्तकात २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता या प्रधान शीर्षाखाली सापडेल.

## हा द्राविडी प्राणायाम करण्याचे कारण काय?

एकाच प्रकारचे खर्च विविध विभागांना येऊ शकतात.

**उदा. क्र. १:** मुख्य लेखा शीर्ष २८८ अन्वये डिपॉझिट लिंक्ड इन्शुरन्स स्कीम या शीर्षाखालील तरतूद ही सामाजिक सुरक्षा व कल्याण या विभागाच्या अंतर्गत दर्शविण्यात येते. परंतु ही योजना विविध विभागांतील अनेक कर्मचाऱ्यांना देखील लागू असल्यामुळे या तरतुदीतील निधी हा विविध विभागांच्या अर्थसंकल्पीय अंदाजात याच प्रमुख लेखा शीर्षाखाली आढळून येईल.

**उदा. क्र. २:** पाणीपुरवठा व स्वच्छता या वरील खर्च पाणीपुरवठा स्वच्छता विभागास येऊ शकतो. शहरी भागात नगरविकास विभाग तेच काम करण्याकरिता अनुदान देत असते. काही ठिकाणी सार्वजनिक आरोग्य विभाग तेच काम करीत असते मग पाणीपुरवठा व स्वच्छता या बाबींवर, राज्याने एकूण पैसा किती खर्च केला हे कसे कळेल म्हणून मुख्य लेखाशीर्षा अंतर्गत त्याची एकूण तरतूद ठरली की विविध विभाग त्या तरतुदीतून आपला वाटा घेत असतात व मुख्य लेखा शीर्ष तेच राहते व त्याचा विनयोग मात्र त्या विभागाच्या बजेटमध्ये ठरत असतो. आपण जर पाणीपुरवठा स्वच्छता विभागाचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज २००४-२००५ बघितले तर त्यात खालील मुख्यलेखा शीर्षातून खर्च दाखविण्यात आला आहे.

१) २०४९ व्याज प्रदाने, २) २,२१५ पाणीपुरवठा व स्वच्छता, ३)२७०२ लहान पाटबंधारे, ४) ३,४५१ आर्थिकसेवा, ५) ४,२१५ पाणीपुरवठा व स्वच्छता यावरील भांडवली खर्च इत्यादी म्हणजेच या पद्धतीमुळे डुप्लीकेशन होत नाही व खर्चाचे आकलन व नियंत्रण राहते.

## व्हाईट बुक भाग तीन

व्हाईट बुक भाग ३ - याचे एकूण ४ परिशिष्ट असतात. हा सदस्यांचा आवडीचा भाग आहे. कारण प्रत्यक्ष बांधकामाच्या तरतुदींचा उल्लेख यात सापडतो.

परिशिष्ट 'अ' -जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांना देय अनुदान व कर्ज

परिशिष्ट 'ब'- १) बांधकामे, रस्ते व पूल

२) बांधकामे - इमारती

परिशिष्ट 'क' - पाटबंधारे विभागाच्या बांधकामा संबंधातील तरतुदी

परिशिष्ट 'ड' - आदिवासी विभागाच्या बांधकामा संदर्भातील तरतूदी

**उदाहरण**: या भाग तीनच्या परिशिष्टामध्ये सर्वांत लठ्ठ पुस्तक असते सार्वजनिक बांधकाम विभागाचे. अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या रस्ते आणि पूल बांधकाम संबंधीच्या निरनिराळ्या तरतुदींचा तपशील दिलेला असतो. सदस्यांच्या मतदारसंघातील रस्ता किंवा पूल यावर यामध्ये तरतूद नसली तर ते काम होऊच शकत नाही.

तसेच आपण सन २००४-०५ चे पाटबंधारे विभागाचे पुस्तक बघितल्यास त्यात नेमके कोणत्या प्रकल्पावर किती निधीची तरतूद केली आहे हे आपल्याला दिसून येते. याच भाग तीनमध्ये एक परिशिष्ट हे जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या योजना व बांधकामे, त्यांचे हस्तांतरण इत्यादी यावरील तपशिलाबाबत असते.

## ५. बजेट मेमोरँडम अथवा ब्ल्यू बुक

याचे मुखपृष्ठ निळ्या रंगाचे असते. ही दोन पुस्तके असतात व प्रत्येक पुस्तकाचे दोन भाग असतात.

Volume ह्र एकमध्ये भाग १ आणि २ असतो त्यामध्ये मागील वर्षीच्या अर्थ संकल्पात व चालू वर्षीच्या सुधारित अंदाजात ज्या जमाखर्चाच्या बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात अंदाज चुकले आहेत किंवा केलेल्या अंदाजापेक्षा वेगळी परिस्थिती झाली आहे त्याची सखोल कारणमीमांसा केली जाते.

Volume ह्न दोनमध्ये भाग ३ आणि ४ अंतर्गत अर्थसंकल्पात एखादे नवीन लेखाशीर्ष समाविष्ट केले असेल त्याची कारणमीमांसा विवरण इ. दिलेले असते.

## ६. वार्षिक योजना (भाग एक, दोन व तीन)

आगामी वित्तीय वर्षात राबवायच्या प्रस्तावित विकास कार्यक्रमांची तपशीलवार माहिती या प्रकाशनामधून मिळते. या प्रकाशनाद्वारे वार्षिक योजनेत समाविष्ट केलेल्या प्रत्येक योजनेचे चालू व मागील वर्षात झालेले कार्य व वित्तीय यांच्या अनुरोधाने कार्यक्रमातील प्रमुख वैशिष्ट्ये समजू शकतात. अर्थसंकल्पात ज्यासाठी तरतुदी करण्यात आल्या आहेत त्या योजनांसंबंधीचाच, तपशील अर्थसंकल्पीय अंदाजात देण्यात येतो, तर 'वार्षिक योजना' या प्रकाशनात वर्षभरात हाती घ्यावयाच्या सर्व विभागांच्या सर्व योजनांसंबंधीचा तपशील देण्यात येतो. विविध विभागांतर्गत योजनांतर्गत विकासात्मक खर्चाचा वार्षिक तपशील यामध्ये दिलेला असतो. वार्षिक योजना व तिचा आकार हा राज्याच्या प्रगतीचा फार मोठा मापदंड व आधार आहे.

**भाग एक**: पहिल्या भागात नियोजनाची प्रक्रिया तसेच वार्षिक योजनेचे सेक्टोरल म्हणजेच शीर्षवार तरतुदी तसेच प्रत्येक सेक्टरच्या कार्यक्रमाचे ढोबळमानाने मूल्यमापन केले असते.

**भाग दोन**: वार्षिक योजना भाग दोनमध्ये राज्याच्या वार्षिक विकास योजनेचे संपूर्ण विस्तृत विवरण सापडते, म्हणजेच; येत्या वर्षात राज्यात योजना अंतर्गत नेमकी कोणती कामे होणार आहे हे यात पाहता येते. यामध्ये त्या वर्षासाठीचा नियतव्यय व उद्दिष्टे दाखविणारी विवरणपत्रे, गोषवारा (Abstract) व सविस्तर (Detailed) पणे नमूद केलेली असतात.

**भाग तीन**: भाग तीनमध्ये योजना निहाय व विकासमंडळ निहाय नियतव्ययाचे 'गोषवारा विवरणपत्र', शीर्ष आणि उपशीर्ष दिले असते. यामध्ये तरतूद ही विकासमंडळ निहाय दाखविताना जी संपूर्ण राज्याकरिता

तरतूद आहे ती अविभाग्य (Non-Divisible) या शीर्षाखाली दाखविण्यात येते.

## ७. वाणिज्यिक किंवा अर्धवाणिज्यिक स्वरूपाचा व्यवहार करणाऱ्या महत्त्वाच्या शासकीय योजनांचे आर्थिक अंदाज दर्शविणारे विवरण पत्र

(Financial Forecast of Important Scheme of Trading)

या पुस्तकात शासन ज्या योजनांच्या मार्फत पणन किंवा विपणनाचा किंवा इतर प्रकारचा वाणिज्यिक स्वरूपाचा व्यवहार करीत असते त्या बाबतचे संपूर्णविवरण जसे की या योजनांचा नफा अथवा तोटा याचे अंदाज दिलेले असतात. या प्रकाशनात शासनाच्या महत्त्वाच्या वाणिज्यिक किंवा अर्थ-वाणिज्यिक व्यापारी योजनांचे व्यापारविषयक लेखे देण्यात येतात. त्यामध्ये योजनांचा अपेक्षित नफा अथवा तोटा, प्रशासनिक खर्च इ. बाबी येतात. निरनिराळ्या दूध योजना यांसारख्या विविध वाणिज्यिक किंवा अर्ध वाणिज्यिक योजनांचे व्यापारविषयक लेख यात समाविष्ट केले जातात. उदा. कापूस एकाधिकार योजना, शासकीय दूध योजना इ.

## ८. मागासवर्गीयांच्या कल्याणासाठीच्या योजना

या योजनांचा तपशील आणि त्यावरील तरतुदी बाबतची माहिती या पुस्तकातून मिळते.

## ९. कार्यक्रम अंदाजपत्रक (Performance Budget)

याचे मुख्य उद्दिष्ट आहे, शासनाला कळावे की विविध खात्यांमध्ये अर्थसंकल्पीय तरतुदींच्या खर्चातून नेमके काय होते आहे? किती होते आहे? काय उद्दिष्ट आहे? आणि नेमकी किती किंमत मोजावी लागते आहे? तसेच यामध्ये विविध विभागांच्या मंजूर पदांचा तपशीलही प्राप्त होतो. सध्या अर्थसंकल्पीय गरज जरी वास्तव लक्ष्यांच्या आधारे ठरविण्यात येत असल्यातरी अर्थसंकल्प मात्र वित्तीय परिभाषेत सादर करण्यात येतो. एखाद्या विभागाकडून काय काम केले जात आहे, किती प्रमाणावर ते केले जात आहे व त्यासाठी किती खर्च केले जात आहेत ते शोधून काढण्याचे

एक साधन उपलब्ध करून देणे हे कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करण्यामागील मुख्य प्रयोजन आहे. म्हणून कार्यक्रम अंदाजपत्रकात ज्यासाठी आर्थिक तरतुदीची आवश्यकता आहे अशी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करावयाचा खर्च आणि पूर्ण कामाचे मूल्यमापन करणारी परिणामात्मक आधारसामग्री देण्यात येते.

## अनुपालन अहवाल

अर्थसंकल्पीय प्रकाशनामध्ये राज्यपालांनी राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१ (२) (ब) अन्वये दिलेल्या निदेशान्वये अनुशेष निर्मूलनासाठीच्या तरतुदी बाबत राज्यशासनाने केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा लागतो.

चार

# काही महत्त्वाच्या संज्ञांचे (Terms) अर्थ



## १. राज्याचा एकत्रित निधी (Consolidated fund) (राज्यघटनेचा अनुच्छेद २६६/१)

राज्याला विविध मार्गांतून मिळणारा संपूर्ण महसूल, राज्याद्वारे उभारलेले सर्व कर्ज आणि कर्ज परताव्या-मध्ये राज्याला मिळणारे सर्व उत्पन्न म्हणजे राज्याचा एकत्रित निधी (Consolidated fund) होय. शासनाच्या विविध कार्यांवर होणारा खर्च या एकत्रित निधीतून भागविला जातो.

## २. आकस्मिता निधी (Contingency fund) (राज्यघटनेचा अनुच्छेद २६७/२)

अर्थसंकल्पात तरतूद न केलेले, अकस्मात उद्‌भवलेले अत्यंत महत्त्वाचे खर्च भागविण्याकरिता किंवा अनेकदा केलेली तरतूद अपुरी असल्यामुळे आणि खर्च मात्र अत्यावश्यक असल्यास असा खर्च भागविण्याकरिता या आकस्मिता निधीची तरतूद केली जाते. हा खर्च पुढे पूरक मागण्यांच्या रूपात विधान मंडळात मंजुरी करिता मांडण्यात येतो व त्याकरिता पुनर्विनियोजन करण्यात येते.

## ३. लोकलेखा (Public Accounts) (राज्यघटनेचा अनुच्छेद २६६/२)

यामध्ये एकत्रित निधीमध्ये अंतर्भूत केलेल्या रकमा वगळून शासनाला किंवा शासनाच्या वतीने मिळालेल्या इतर सर्व रकमा जमा करण्यात येतात.

यातील व्यवहार बँकिंग व समायोजनाच्या स्वरूपाचे असल्याने यातून खर्च करण्यासाठी विधानमंडळाच्या मंजुरीची आवश्यकता नसते. म्हणजेच लेखांच्या बाबतीत राज्यशासन बँकरची भूमिका करीत असते आणि ज्यावर व्याज देत असते व परत करण्याची जबाबदारी राज्यशासनाची असते असा निधी अथवा लेखे.

उदा. अल्पबचतचे पैसे, प्रॉव्हिडंट फंडाचे पैसे, राज्यमार्ग निधी, शिक्षण उपकर निधी इ. लोकलेखा स्वतंत्रपणे सांभाळला जातो आणि तो राज्याच्या एकत्रित निधीचा भाग असत नाही.

## ४. दत्तमत खर्च (Voted expenditure)

राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या खर्चाच्या पै अन पै ची मान्यता ही विधानसभेतून घ्यावी लागते. यातील काही बाबी सोडल्या तर सर्व खर्च हा दत्तमत असतो म्हणजे ज्याला मतदानाने मंजुरी मिळवावी लागते. याचा अर्थ असा की विभागाच्या खर्चाच्या मागण्या या विधानसभेत मतदानाला टाकाव्या लागतात आणि त्या मतदानाने मान्य होतात.

## ५. भारित खर्च (Charged expenditure)

हा खर्च मतदानाला टाकला जात नाही तर हा राज्याच्या एकत्रित निधीवर भारित असतो. त्यामुळे विधानसभा याला नाकारू शकत नाही. उदा. मा.न्यायमूर्ती, मा.राज्यपाल, मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष विधान सभा, मा.सभापती व उपसभापती विधानपरिषद यांचे पगार, भत्ते आदींचा खर्च शासनाच्या कर्जावरील व्याजाचा खर्च, न्यायालयाच्या आदेशान्वये भागवायचा खर्च इत्यादी.

## ६. योजनांतर्गत खर्च (Plan expenditure)

राज्याच्या वार्षिक योजने अंतर्गत असलेला खर्च. हा खर्च संपूर्णपणे विकासात्मक खर्च असतो.

## ७. योजनेतर खर्च (Non plan expenditure)

योजनेतर खर्चात सर्वसाधारणपणे राज्याचे सर्व विकासेतर खर्च भागविले जातात. उदा. कर्मचाऱ्यांचे पगार, पेन्शन, कायदा सुव्यवस्था व कर वसुली यावर येणारा खर्च, सामान्य प्रशासनावर येणारा खर्च इत्यादी.

## ८. महसुली लेखे (Revenue account)

हे दोन प्रकारचे असतात.

**A. महसुली जमा (Revenue Receipt):** राज्यशासनाचे सर्व प्रकारचे कर, सेस, शुल्क या माध्यमातून येणारे उत्पन्न, केंद्रीय कर व शुल्कातील राज्याला मिळणारा हिस्सा व करेतर उत्पन्न जसे की प्राप्त होणारे व्याज, फी, शास्ती (Fine and penalties) चे उत्पन्न तसेच केंद्र शासनाकडून मिळणारी विविध अनुदाने याला महसुली जमा असे म्हणतात.

**B. महसुली खर्च (Revenue Expenditure):** राज्य प्रशासन, राज्य विधानमंडळ, कर वसुली यावर होणारा खर्च, कर्ज परतफेड आणि व्याज प्रदान करणे, पेन्शन तसेच विविध संस्थांना अनुदाने देणे व शासनाच्या विविध विभागांतर्गत प्रशासकीय खर्च करणे.

## ९. भांडवली लेखे (Capital Account)

हे खालील प्रकारचे असतात.

**(अ) महसुली लेखा बाहेरील भांडवली खर्च:** शासनाने कायम स्वरूपी मत्ता निर्माण करण्याकरिता अथवा प्राप्तकरण्याकरिता केलेले खर्च. जमीन अधिग्रहीत करणे, रस्ते अथवा पुलांचे बांधकाम, पाटबंधारे अथवा ऊर्जा निर्मिती वरील खर्च, (Plant and Machinery) वरील खर्च, कर्ज रोख्यातील गुंतवणूक, खाद्यान्नाची भांडारे इत्यादी भांडवली खर्चाचे प्रकार आहेत.

**(ब) भांडवली उत्पन्न:** साधारणपणे शासनाच्या मत्तेच्या विक्रीतून प्राप्त झालेले उत्पन्न.

## १०. महसुली तूट आणि महसुली शिल्लक

(Revenue deficiet and Revenue surplus)

राज्याच्या अर्थसंकल्पात ज्या वेळी एकूण महसुली जमेपेक्षा महसुली खर्च अधिक असतो त्यावेळी त्याला महसुली तूट मानले जाते. परंतु ज्यावेळी जमा होणारा महसूल हा महसुली खर्च भागवून उरतो अथवा अधिक असतो त्याला महसुली शिल्लक म्हणतात.

'महसुली शिल्लक चांगली' तर महसुली तूट ही राज्याच्या अर्थव्यवस्थेत चिंताजनक मानली जाते.

## ११. तुटीचा अर्थसंकल्प (Budget deficit)

महसुली व भांडवली लेखावरील एकूण उत्पन्नापेक्षा एकूण खर्च ज्यावेळी अधिक असतो त्यावेळी त्याला अर्थसंकल्पीय तूट असे म्हणतात.

## १२. राजकोषीय तूट (Fiscal deficit)

वर उल्लेखित केलेल्या अर्थसंकल्पीय तुटीत भांडवली उत्पन्नातील कर्ज व इतर दायित्व समाविष्ट केल्यावर जी रक्कम तयार होते तिला राजकोषीय तूट असे म्हणतात.

## १३. मागण्या (Demands)

प्रत्येक विभागाला आपल्या विभागांतर्गत जो खर्च अपेक्षित आहे तो अर्थसंकल्पात समाविष्ट केला जातो व हा खर्च कशाकरिता करण्यात येणार आहे याच्या स्पष्टीकरणासह मागणीच्या स्वरूपात तो विधानमंडळापुढे मंजुरीसाठी मांडावा लागतो.

## १४. पूरक मागण्या (Supplementry Demands)

एखाद्या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात अंदाजित केल्यापेक्षा अधिक खर्च एखाद्या बाबीवर होत असेल अथवा वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना ज्या खर्चाची कल्पना करण्यात आली नसेल असा नवीन बाबींवरील खर्च, अर्थ-संकल्पात तरतूद न केलेल्या आकस्मिक स्वरूपाचा खर्च करावा लागला असेल तर तो आकस्मिता निधीतून केला जातो व मग पूरक मागण्यांच्या

स्वरूपात त्याच्या स्पष्टीकरणासह विधानसभेसमोर मंजुरीकरिता मांडावा लागतो.

## १५. अधिक खर्चाच्या मागण्या

या मागण्या पूरक मागण्यांपेक्षा भिन्न असतात कारण पूरक मागण्यांमधील चालू आर्थिक वर्षाकरिता मागणी असते तर यामध्ये मागील वित्तीय वर्षात झालेल्या अधिकच्या खर्चाकरिता मागणी असते.

## १६. विनियोजन विधेयक (Appropriation Bill)

सर्व विभागांच्या खर्चाच्या मागण्या एकत्रितपणे मतास टाकून मंजूर झाल्यावर त्याचे कायद्यात रूपांतर करावे लागते याला विनियोजन विधेयक म्हणतात. आणि या मागण्या समवेत जो भारित खर्च आहे त्याचा अंतर्भाव करून राज्याच्या एकत्रित निधीतून हा खर्च भागविण्याचे अधिकार शासनास याद्वारे प्राप्त होतात.

## १७. पुनर्विनियोजन विधेयक (Reappropriation Bill)

पूरक मागण्या संदर्भात जे विधेयक येते त्याला पुनर्विनियोजन विधेयक असे म्हणतात.

## १८. वित्तीय विधेयक (Finance Bill)

राज्याचा अर्थसंकल्प मांडताना भाषणाच्या दुसऱ्या भागात वित्तमंत्री करासंबंधीचे प्रस्ताव मांडतात. याच प्रस्तावाचे विधेयकात रूपांतर करण्याकरिता विधानसभेसमोर वित्तीय विधेयक (Finance Bill) मांडले जाते. या विधेयकामुळे कर कमी किंवा अधिक होतो अथवा त्यात सूट मिळते किंवा त्यावरची शास्ती इ. वाढते व त्यामुळेच वस्तूंचे भाव कमी-अधिक होतात. लौकिक अर्थाने नागरिकांना भाव कमी अधिक होणे म्हणजेच बजेट असे वाटते.

## १९. नियतव्यय

नियतव्यय म्हणजे खर्चाची नियोजित मर्यादा.

## २०. सुधारित अंदाज

सन २००८-०९ चा अर्थसंकल्प मार्च २००८ मध्ये मांडला जातो. त्यावेळी जमा व खर्चाचे अंदाज केलेले असतात. २००८-०९ चा अर्थसंकल्प मार्च २००८ मध्ये मांडत असताना साधारणतः मागील १० महिन्यांचा प्रत्यक्ष जमा-खर्च माहिती असतो व त्याच आधारावर मार्च अखेर वर्ष संपल्यास किती जमा-खर्च झाला असेल याचा पुनःश्च अंदाज काढला जातो ज्याला सुधारित अंदाज असे म्हणतात.

पाच

# राज्याच्या उत्पन्नाचे अंदाजपत्रक तयार करणे



## शासनाच्या उत्पन्नाचे अंदाजपत्रक तयार करणे

कोणत्याही अर्थसंकल्पाच्या दोन बाजू असतात. एक उत्पन्न आणि दुसरी खर्च. उत्पन्नाचे वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार झाल्या–शिवाय खर्चाचे योग्य अंदाजपत्रक तयारच होऊ शकत नाही. कारण त्याच्या आधारावरच शासनाला वार्षिक योजना, नव्या योजना यांकरिता तरतुदी इ. कराव्या लागतात.

हे अंदाजपत्रक अचूक असेल तरच राज्याच्या अर्थव्यवस्थेचे स्वास्थ्य चांगले राहते. हे अंदाज फुगवून दाखविले तर आर्थिक डोलाराच कोसळण्याची शक्यता असते.

## शासनाची तिजोरी म्हणजे राज्याचा एकत्रित निधी

एकत्रित निधीत उत्पन्न खालील बाबीतून येते.

(अ) करातून उत्पन्न, करेतर उत्पन्न आणि अनुदाने हे महसुली लेख्याचा भाग असतात.

(ब) भांडवली लेख्यातील उत्पन्न.

(क) सार्वजनिक ऋण, कर्ज आणि अग्रीम तसेच आंतरराज्य समझौते यातील उत्पन्न.

राज्याचे करातील उत्पन्न आणि केंद्र शासनाच्या करातील वाटा यातून राज्याला सर्वाधिक उत्पन्न येते.

| **राज्याचे कर** | **या केंद्रीय करातील वाटा मिळतो** |
|---|---|
| १. विक्री कर | १. आयकर |
| २. राज्य उत्पादन शुल्क | २. इस्टेट ड्युटी |
| ३. मुद्रांक आणि नोंदणी फी | ३. केंद्रीय उत्पादन शुल्क |
| ४. जमीन महसूल | ४. हॉटेल रिस्पीट कर |
| ५. व्यवसाय कर | |
| ६. शेती आयकर | |
| ७. वाहने, वस्तू व प्रवासी यावरील कर. | |
| ८. विजेच्या विक्रीवरील कर. | |
| ९. इतर वस्तू व सेवाकर जसे की मनोरंजन कर, शिक्षण शुल्क इ. | |

कराचे उत्पन्नाचे अंदाज तयार करताना मागील अनुभव आणि सद्य परिस्थिती याचे आकलन करायचे असते. उदाहरणार्थः दुष्काळाच्या कालावधीत जमीन महसूल माफ होतो, त्यामुळे अशा कालावधीत उत्पन्नाचे अंदाज घेताना या बाबींची काळजी घ्यावी लागते.

## करेतर उत्पन्न

राज्याच्या कराव्यतिरिक्त उत्पन्नाचा विचार केला असता ते खालील बाबीतून प्राप्त होते.

१. व्याज आणि लाभांश

२. केंद्र शासनाकडून मिळणारी अनुदाने.

३. विभागीय उत्पन्न उदा.

(अ) शैक्षणिक संस्थाकडून फी रूपाने येणारा निधी.

(ब) कारागृहात तयार होणाऱ्या वस्तूंच्या विक्रीतून येणारे उत्पन्न.

(क) शासकीय मुद्रणालयाचे उत्पन्न

(ड) कृषी विभागांतर्गत बियाणे विक्री

(इ) शासकीय दुग्ध योजना

(ई) वन विभाग

(फ) पाटबंधारे प्रकल्पाची पाणीपट्टी इ.

(ग) ऊर्जा निर्मिती प्रकल्प इत्यादीतून येणारे उत्पन्न.

## लोकलेख्यावरील उत्पन्न

०१. प्रॉव्हीडंड फंड

०२. जनरल इन्शुरन्स फंड

०३. राखीव निधी

०४. दुष्काळ निवारण निधी

०५. राज्य रस्ते निधी

०६. यंत्र सामुग्री व साहित्य घसारा निधी

०७. हमी राखीव निधी

०८. मुंबई इमारती दुरुस्ती व बांधकाम निधी

०९. आरोग्य व सकस आहार निधी

१०. रोजगार हमी निधी

११. वाचनालय निधी

१२. शिक्षण सेस निधी

१३. झोपडपट्टी सुधारणा निधी

१४. विद्युत निधी

१५. ऊर्जा सुधार निधी

१६. कापूस भाव चढ-उतार निधी

लोकलेख्यावरील उत्पन्न हे विशिष्ट प्रयोजना करिताच खर्च करता येते. वरील सर्व बाबींच्या एकत्रित विचारानंतर राज्याचे उत्पन्नाचे अंदाजपत्रक तयार होते.

सहा

# राज्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक करणे



मागील भागात आपण राज्याचे उत्पन्न कुठून येते हे बघितले. आता या भागात आपण राज्य शासनाचे खर्चाचे अंदाजपत्रक कसे तयार होते ते बघणार आहोत. खर्चाचे अंदाजपत्रक तयार करताना ते राज्याच्या एकत्रित निधीतून खर्चाचे अंदाजपत्रक आणि राज्याच्या लोकलेखा आणि राखीव निधीतून करावयाच्या खर्चाचे अंदाज-पत्रक हे स्वतंत्रपणे पण एकत्र दर्शवावे लागते.

## राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या खर्चाचे अंदाजपत्रक

हा खर्च ३ शीर्षकांखाली (Heads) करावयाचा असतो.

१. महसुली खर्च (Revenue Account)

२. भांडवली खर्च

(या दोन्ही खर्चाचे विवरण आपण प्रकरण ३ मध्ये समजून घेतलेले आहे.)

३. कर्जातून खर्च (Capital Account)

खर्च महसुली असो की भांडवली तो योजनांतर्गत आणि योजनेतर असा वेगवेगळा दर्शवावा लागतो. (योजना अंतर्गत आणि योजनेतर या खर्चाचे विवरण आपण या आधीच प्रकरण ३ मध्ये वाचले आहे.

## लोकलेख्यावरील खर्च

लोकलेखा म्हणजे काय हे आपण प्रकरण ३ मध्ये वाचलेच आहे. लोकलेख्यावरील खर्चाचे अंदाजपत्रक तयार करताना खालील उदाहरणांप्रमाणे कार्यवाही केली जाते.

(अ) प्रॉव्हिडंट फंड किती कर्मचाऱ्यांना द्यावा लागणार आहे याचा अंदाज व प्रॉव्हिडंट फंडातून किती अॅडव्हान्स द्यावा लागेल याचा अंदाज साधारणपणे मागील वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या आधारावर काढला जातो व तितके प्रावधान खर्चाच्या अंदाजपत्रकात केले जाते.

अशाच प्रकारची कार्यवाही इन्शुरन्स फंड असो अथवा इतर निधी असतील त्याबाबतचे अंदाजपत्रक तयार करताना केली जाते.

सात

# विधिमंडळात बजेटची प्रक्रिया



## १. अर्थमंत्री बजेट मांडतात

सर्वसाधारणपणे केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आणि ३१ मार्चच्या आधी विधान-मंडळात राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जातो. एकाच दिवशी विधानसभेमध्ये अर्थमंत्री तर विधानपरिषदेत अर्थराज्यमंत्री बजेट सादर करतात. (म्हणजेच बजेटचे भाषण वाचतात.)

## २. सर्वसाधारण चर्चा

बजेट सादर केल्यानंतर त्यावर सर्वसाधारण चर्चा करण्यात येते. या चर्चेत साधारणपणे अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या तत्त्वांवर तसेच राज्याच्या आर्थिक अथवा कृषी, उद्योग इ. विषयांच्या धोरणांच्या अनुषंगाने भाषणे दिली जातात. नियमानुसार ही चर्चा बजेट सादर केल्यापासून ७ दिवसांच्या अंतरांनी सुरू करावयाची असते. तसेच सर्वसाधारणपणे विधानसभेत ही चर्चा ६ दिवस व विधानपरिषदेत ५ दिवस केली जाते.

नियमात हा कालखंड दिला असला तरी तो कमी करण्याचा अधिकार सभागृहाला असल्याने तो कमी करण्याचा प्रस्ताव वित्तमंत्री मांडतात व सहमतीने तो कमी केला जातो अशी अलीकडच्या काळात प्रथा पडली आहे. त्यामुळे विधानसभेतही सर्वसाधारण चर्चा देखील २ दिवसच होते. या सर्वसाधारण चर्चेनंतर विधानपरिषदेत बजेटची प्रक्रिया संपते व त्यानंतर केवळ विनियोजन विधेयकच परिषदेपुढे जाते.

## ३. मागण्या

प्रत्येक विभागाला आपल्या विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदी मागण्यांच्या रूपाने ठेवाव्या लागतात. या मागण्या White बुकच्या माध्यमातून सदस्यांना प्राप्त झालेल्या असतात. सर्वच विभागाच्या मागण्या या मतास टाकाव्या लागतात. परंतु विधानसभा अध्यक्ष, सर्वसाधारणपणे सभागृहाचे नेते आणि प्रथेप्रमाणे विरोधी पक्षनेते यांच्याशी चर्चा करून कोणत्या विभागाच्या मागण्यांवर चर्चा करावी हे ठरवितात. नियमानुसार मागण्यांची चर्चा ही अधिकतम १८ दिवस चालू शकते व मागण्यांवर मतदान हे बजेट सादर केल्यापासून १० दिवसानंतरच घेता येते.

या मागण्यांवरील चर्चेच्या अनुषंगाने, त्या विभागाच्या धोरणावर, काम-काजावर, परफॉर्मन्सवर, अर्थसंकल्पावर, विकासाच्या गतीवर सखोल अशा प्रकारच्या चर्चा घडून येते आणि सदस्यांच्या चर्चेअंती सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना संबंधित विभागाचे मंत्री उत्तरे देऊन आपल्या मागण्यांचे समर्थन करतात व नंतरच त्या मतास टाकण्यास येतात व सर्वसाधारणपणे आवाजी मतदानाने मंजूर करण्यात येतात. पुरवणी मागण्या संदर्भात मागणीतील संबंधित बाबीवरच सदस्यांना बोलता येते. सर्वसाधारण धोरणावर बोलता येत नाही.

## ४. कपात सूचना (Cut Motion)

सर्वसाधारणपणे केवळ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी वापरावयाचे हे आयुध आहे. शासकीय खर्चाच्या दत्तमत (१) आणि (२) भारित (Charged) या प्रकारापैकी 'दत्तमत' या शीर्षाखाली अर्थसंकल्पात ज्या रकमा दाखविल्या जातात त्यावरच सभागृहात मतदान घेतले जात असल्यामुळे 'दत्तमत' रकमांच्या अनुदानांच्या संबंधात कोणतेही अनुदान १) कमी करण्यासाठी किंवा २) त्यातील कोणतीही बाब वगळण्यासाठी किंवा ३) एखादी बाब कमी करण्यासाठी सदस्य 'कपात सूचना' देऊ शकतात, परंतु अनुदान वाढविण्यासाठी किंवा त्याचा उद्देश बदलण्यासाठी असे प्रस्ताव (कपात सूचना) देता येणार नाहीत.

कपात सूचना ती ज्या मागणीशी संबंधित आहे ती मागणी सभागृहात चर्चेसाठी व मतदानासाठी ज्या दिवशी येणार असेल त्याच्या चार पूर्ण दिवस आधी द्यावयाची असते. १ रुपया व्यतिरिक्त इतर कपात सुचविणाऱ्या सूचनांवर मंत्री नंतर सविस्तर लेखी उत्तर पाठवितात अशी प्रथा आहे. नियमानुसार या सूचना योग्यवेळी नोटीस दिली असेल तर ज्या मागणीला कपात सुचविली आहे ती मागणी मतदानाला आल्यावर ही सूचना मांडण्याची परवानगी मा. अध्यक्ष देतात व ती तशाप्रकारे मांडल्यावर त्यावर मतदान होते.

## कपात सूचना तीन प्रकारच्या असतात

### १. एक रुपया कपात (धोरणात्मक कपात)

**(Disapproval of Policy Cut)**

अत्यंत महत्त्वाचे धोरणविषयक प्रश्न. त्यात शासनाला आलेले अपयश इ. विषय यात मांडता येतात. ही कपात सूचना अविश्वासाचा प्रस्ताव निदर्शक म्हणून समजली जाते आणि म्हणून शासनावर अविश्वास व्यक्त करावयाचा असेल तरच अशी सूचना दिली पाहिजे. ही सूचना सभागृहात मांडण्यात येऊन मंजूर झाल्यास मान्य संसदीय प्रथेप्रमाणे मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

### २. लाक्षणिक कपात (Token Cut)

शासनाच्या सर्वसाधारण कारभारावर किंवा संबंधित विभागाच्या सर्वसाधारण धोरणावर चर्चा उपस्थित करावयाची असेल तर कोणत्याही मागणीला नाममात्र (लाक्षणिक) १०० रुपयांची कपात सूचना दिली पाहिजे. अशी कपात सूचना सभागृहाने मंजूर केल्यास त्याचा अर्थ सभागृहाने शासनाच्या धोरणावर असमाधान व्यक्त केले असा होतो.

### ३. विशिष्ट रकमेची कपात (Economy Cut)

मागणीत किंवा त्यातील एखाद्या बाबीच्या संबंधात विशिष्ट रकमेची कपात जेव्हा सुचवायची असते त्यावेळी त्या विशिष्ट रकमेची कपात सूचना दिली पाहिजे. अशी सूचना देतेवेळी सदरहू कपात कशी करता येईल हे

त्या सदस्याने दाखवून दिले पाहिजे. अशी सूचना सभागृहाने मंजूर केल्यास फक्त कमी केलेल्या रकमेच्या अनुदानासाठीच्या मागणीवरच मतदान केले जाते.

## ४. गिलोटीन

मागण्यांवरील चर्चेत अंतिम दिवशी सभागृह संपण्याच्या दोन तास अगोदर 'गिलोटीन' लागू केले जाते. 'गिलोटीन' म्हणजे चर्चारोध, मा. अध्यक्षांनी 'गिलोटीन' घोषित केल्यानंतर त्यापुढे कोणत्याही मागणीवर कोणतीही चर्चा होऊ शकत नाही. तर उर्वरित मागण्यासंबंधी मंत्री केवळ औपचारिकरित्या वाचून सभागृहासमोर मांडतात व मा. अध्यक्ष त्या एकत्रितपणे मतास टाकून मंजूर करून घेतात.

## ५. विनियोजन विधेयक

मागण्यांवरील मतदान पूर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर मा. अर्थमंत्री विनियोजन विधेयक मांडतात. या विधेयकात मंजूर झालेल्या सर्व मागण्या तसेच भारित खर्चाच्या सर्व बाबींचे संपूर्ण विवरण असते. त्यात भारित किती, दत्तमत किती व कोणत्या सेवांकरिता / बाबींकरिता ते वापरले जाणार आहे हे नमूद केलेले असते. प्रत्येक विभागाची माहिती, महसुली लेख्यावरील खर्च, भांडवली लेख्यावरील खर्च आणि ऋण विभागांतर्गत खर्च अशा तीन हेड्सखाली स्वतंत्रपणे नमूद केलेली असते व कोणत्याही परिस्थितीत यातील एकूण खर्चाच्या बाबी Annual Financial Statement पेक्षा अधिक असू शकत नाही.

विनियोजन विधेयक मांडले जाते ते राज्याच्या एकत्रित निधीतून. वरील खर्च करण्याची परवानगी मिळण्याकरिता आणि हे विधेयक कायद्यात रूपांतरित झाल्याशिवाय राज्याच्या तिजोरीतून एक दमडीही खर्च करता येत नाही.

## ६. विनियोजन विधेयकावर चर्चा

सर्वसाधारणपणे या विधेयकावर चर्चा होत नाही कारण मागण्यांच्या वेळी सर्व बाबींवर चर्चा झालेली असते; परंतु ज्या बाबींवर मागण्यांच्या

वेळी चर्चा होऊ शकली नाही त्या बाबींवर पूर्वसूचना देऊन चर्चा उपस्थित करता येते. साधारणपणे ही सूचना विनियोजन विधेयक मांडले जाणार आहे त्या दिवशी सभागृह सुरू होण्याच्या एक तास आधीपर्यंत मा. अध्यक्षांना द्यावी लागते व मा. अध्यक्षांना जर याची खात्री पटली की चर्चेची सूचना सुसंगत आहे तर ते तशी परवानगी देऊ शकतात.

## ७. विधान परिषदेमध्ये विनियोजन विधेयक

विधानसभेने मंजूर केलेले विनियोजन विधेयक विधान परिषदेत मंजुरीकरिता सादर केले जाते. विधानपरिषदेला ते नाकारता येत नाही. पण त्यावर सुधारणा सुचविण्यास अधिकार मात्र विधानपरिषदेला असतो. अशा प्रकारची सुधारणा सुचविल्यास उपरोक्त विधेयक पुनःश्च विधानसभेसमोर येते व ही सूचना स्वीकारण्याचे अथवा फेटाळण्याचे अधिकार विधानसभेला असतात.

## ८. मा. राज्यपालांची मान्यता

अशाप्रकारे विधानसभेने मान्य केलेले विनियोजन विधेयक राज्यपालांच्या मान्यतेकरिता पाठविले जाते व त्यांच्या मान्यतेनंतर त्याचे कायद्यात रूपांतर होते. राज्यपालांच्या मान्यतेनंतरही खऱ्या अर्थाने बजेट पास झाले असे म्हणता येऊन त्यानुसार खर्च करण्याचे अधिकार राज्यशासनाला प्राप्त होतात.

## ९. लेखानुदान (Vote on Account)

साधारणपणे आर्थिक वर्ष हे ३१ मार्चला संपते व तोपर्यंत नवीन अर्थसंकल्पाची कार्यवाही पूर्ण न झाल्यास १ एप्रिलपासून शासनाला राज्याच्या तिजोरीतून एक नवा पैसा खर्च करण्याचा अधिकार राहात नाही. म्हणून लेखानुदानाची व्यवस्था तयार करण्यात आली आहे. ज्याद्वारे साधारणपणे किंवा त्या आधी नवीन बजेट मान्य होईपर्यंतच्या कालावधीकरिता शासनास जो खर्च करावा लागणार आहे त्याची मंजुरी लेखानुदानाने घेता येते. या मध्ये ३१ मार्च पूर्वी अर्थमंत्री तशाप्रकारचे खर्चाचे स्टेटमेंट सभागृहासमार मांडतात. त्यावर सर्वसाधारण चर्चा होते व

मतदानाने ते मंजूर करण्यात येते. त्यानंतर त्याचे विनियोजन (लेखानुदान) विधेयक मांडण्यात येऊन ते मंजूर करून घ्यावे लागते.

३४ दिवसांची प्रक्रिया - साधारणपणे ही बजेटची प्रक्रिया ३४ दिवसांची असते.

०१ दिवस बजेट मांडणे.

०२ दिवसानंतर सर्वसाधारण चर्चा सुरू.

०६ दिवसपर्यंत सर्वसाधारण चर्चा.

१८ दिवसपर्यंत मागण्यांवर चर्चा आणि मतदान.

०२ दिवस विनियोजन विधेयक विधानसभा/परिषदेची मान्यता व मा. राज्यपालांची संमती.

**३४ एकूण दिवस.**

ही प्रक्रिया ३४ दिवसांची असली तरी अलीकडच्या काळात अधिवेशनच इतके दिवस चालत नसल्याने या नियमांना असलेले अपवादच नियम होऊन फार तर दोन ते तीन आठवड्यात सर्व कामकाज आटोपते.



**श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस**

- नागपूर विद्यापीठातून एम्.बी.ए., एलएल्.बी. च्या परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान, तसेच हिंदू लॉ या विषयात विशेष प्रावीण्यासह पारितोषिकाचे मानकरी ठरले.

- बर्लीन येथून प्रोजेक्ट मॅनजमेंट या विषयातील पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला.

- १९९२ व १९९७ साली नागपूर महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले व 'सर्वांत तरुण महापौर' म्हणून पदारूढ झाले.

- 'मेयर इन कौन्सिल' उपक्रमात महाराष्ट्रातील 'पहिले महापौर' म्हणून लौकिक मिळवला.

- १९९९ पासून २००९ पर्यंत महाराष्ट्राच्या विधानसभेत नागपूर पश्चिम क्षेत्राचे प्रतिनिधित्व. २००९ पासून दक्षिण-पश्चिम या विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत.

- २००२-२००३ सालाकरिता उत्कृष्ट 'संसदपटू पुरस्कार' प्राप्त झाला.

- अनेक सामाजिक संस्थांच्या उपक्रमात सहभाग.